सन २०१७-२०१८ या शैक्षणिक वर्षापासून माध्यमिक स्तरावरील पूर्व व्यवसायिक अभ्यासक्रमाच्या नवीन/ अधिकच्या तुकडयांना कायम स्वरूपी विनाअनुदान तत्वावर सुरू करण्यास मान्यता देणेबाबत..

महाराष्ट्र शासन

कौशल्य विकास व उद्योजकता विभाग

शासन निर्णय क्रमांकः : व्हीओसी-२०१७/प्र.क्र. १०९ (भाग-२) /व्यशि-४,

मंत्रालय विस्तार (खोली क्र.४३५), ४ था मजला
हुतात्मा राजगुरु चौक, मादामा कामा रोड, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : ०२ फेब्रुवारी, २०१८

संदर्भ :

१) उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्रमांक : व्हिओसी-२०११/११४७/प्र. क्र. ५/व्यशि-४, दिनांक १३/१/२०११
२) संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्रमांक : ८/व्हीओसी/२२०३/२०१७-१८/२०४, दिनांक १/९/२०१७.
३) संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्रमांक : ८/व्हीओसी/२२०३/२०१७-१८/२१९, दिनांक ३/११/२०१७

प्रस्तावना :

केंद्र शासनाच्या नवीन शैक्षणिक धोरणानुसार माध्यमिक स्तरावर व्यवसाय शिक्षणाची जोड देवून विद्यार्थ्यामध्ये व्यवसाय शिक्षणाची आवड निर्माण करणे व प्राथमिक कौशल्य विकसित करण्याच्या दृष्टिने खालील तीन बहुकौशल्ययुक्त अभ्यासक्रम १९९६-९७ पासून सुरु करण्यात आले. सदर अभ्यासक्रम राज्यामध्ये शासकीय संस्था, अशासकीय अनुदानित संस्था व अशासकीय विनाअनुदानित संस्थेत राबविण्यात येत आहेत.

१. V१ :- मूलभूत तंत्रज्ञानाची ओळख (Introduction to Basic Technology - IBT)
२. V२ :- अभियांत्रिकी तंत्रज्ञानाची मूलभूत तत्वे (Elements of Mechanical Engineering -EME)
३. V३ :- विद्युत आणि इलेक्ट्रॉनिक्स तंत्रज्ञानाची मूलभूत तत्वे (Elements of Electrical and Electronics Technology - EEET)

२. या अभ्यासक्रमांची वाढती मागणी लक्षात घेऊन शैक्षणिक वर्ष २०१७-१८ पासून माध्यमिक स्तरावरील पूर्व व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या नविन/अधिकच्या तुकडया कायम स्वरुपी विनाअनुदानित तत्वावर सुरु करण्यासाठी व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयाकडून प्रस्ताव मागविण्यात आले होते. सदर प्रस्तावांची संचालनालयास्तरावर छाननी करण्यात आली. संचालनालयाने वरील संदर्भ क्र. २ व ३ येथील पत्रान्वये शासनास शिफारस केलेल्या प्रस्तावामधील विहित निकष/मानकाची पूर्तता करणा-या १३ संस्थांच्या १३ तुकडयांना माध्यमिक स्तरावरील पूर्व व्यवसायिक अभ्यासक्रम सुरु करण्यास परवानगी देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:

शासन याव्दारे माध्यमिक स्तरावरील पूर्व व्यवसायिक अभ्यासक्रमाच्या मुंबई, पुणे व औरंगाबाद विभागातील खालील तक्त्यामध्ये नमूद करण्यात आलेल्या १३ अशासकीय संस्थांना त्यांच्या नावासमोर नमूद करण्यात आलेला व्यवसाय अभ्यासक्रम त्यांच्या नावासमोर नमूद करण्यात आलेल्या तुकडयांमध्ये कायमस्वरुपी विनाअनुदानित तत्वावर शैक्षणिक वर्ष २०१७-१८ पासून सुरु करण्यासाठी पुढील अटीं व शर्तींच्या अधिन राहून शासनाची मान्यता देत आहे.

.अ. क्र.	संस्थेचे नाव व पत्ता	संस्थेने मागणी केलेले व्यवसाय अभ्यासक्रम	मागणी केलेल्या तुकडया (प्रत्येकी ६० विद्यार्थी)
१	२	३	४
	मुंबई विभाग		
१	डॉ. म. ग. परुळेकर मित्रमंडळाचे रामचंद्र वासुदेव नेरकर माध्यमिक विद्यालय भास्कर आळी जवळ, पाचु मिठगर समोर, वसई, जि. पालघर	इलेक्ट्रीकल टेक्नॉलॉजी (V३)	१ तुकडी
२	आंजर्ले शिक्षण संस्था आंजर्ले व्दारा संचलित कै. सुरेशजी साठये कला कौशल्य केंद्र आंजर्ले, ता. दापोली, जि. रत्नागिरी	एम. एस. एफ. सी (V१)	१ तुकडी
	एकूण संस्था २	**एकूण तुकडया २**	
	पुणे विभाग		
३	दोंदे शिक्षण प्रसारक मंडळाचे भैरवनाथ माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय,दोंदे,ता.खेड,जि. पुणे	एम. एस. एफ. सी (V१)	१ तुकडी
४	श्री. बापदेव शिक्षण प्रसारक मंडळाचे आदर्श विद्यालय, आंबोली, ता. खेड, जि. पुणे	एम. एस. एफ. सी (V१)	१ तुकडी
५	श्री. शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ संचलित जिजामाता हायस्कूल ॲण्ड ज्युनिअर कॉलेज जेजुरी, ता. पुरंदर, जि. पुणे	एम. एस. एफ. सी (V१)	१ तुकडी
६	सर्वोन्नती मंडळ संचलित गुरुवर्य एकनाथ गोविंद देव प्रशाला, बोरी खुर्द, ता. जुन्नर, जि. पुणे	एम. एस. एफ. सी (V१)	१ तुकडी
७	ग्रामविकास मंडळ हिवरे तर्फे नारायणगाव, ता. जुन्नर , जि. पुणे संचलित कुलस्वामी खंडेराव विद्यालय हिवरे तर्फे नारायणगाव, ता. जुन्नर, जि. पुणे	एम. एस. एफ. सी (V१)	१ तुकडी
८	कोयना शिक्षण संस्था पाटण संचलित श्री क्षेत्रपाल विद्यालय व ज्युनिअर कॉलेज अडुळ, ता. पाटण, जि. सातारा	एम. एस. एफ. सी (V१)	१ तुकडी
९	कोयना शिक्षण संस्था पाटण संचलित श्री माने देखमुख विद्यालय, पाटण ता. पाटण, जि. सातारा	एम. एस. एफ. सी (V१)	१ तुकडी

१०	रयत शिक्षण संस्थेचे न्यु इंग्लिश स्कूल व ज्युनिअर कॉलेज अनवली, ता. पंढरपूर, जि. सोलापूर	एम. एस. एफ. सी (V1)	१ तुकडी
११	रयत शिक्षण संस्थेचे श्री. शिवाजी विद्यालय व ज्युनिअर कॉलेज महुद, बु. ता. सांगोला, जि. सोलापूर	एम. एस. एफ. सी (V1)	१ तुकडी
१२	विद्यांगण शिक्षण प्रसारक मंडळ अत्याळ संचलित महाराष्ट्र हायस्कूल अत्याळ, ता. गडहिलग्ज, जि. कोल्हापूर	एम. एस. एफ. सी (V1)	१ तुकडी
एकूण संस्था १०		**एकूण तुकडया १०**	
औरंगाबाद विभाग			
१३	ज्ञान प्रबोधिनी सोलापूर संचलित ज्ञानप्रबोधिनी विद्यालय,हराळी, ता. लोहारा, जि. उस्मानाबाद	इलेक्ट्रीकल टेक्नॉलॉजी (V4)	१ तुकडी
एकूण संस्था १		**एकूण तुकडी १**	
एकूण १३ संस्था		**एकूण १३ तुकडया**	

<u>अटी व शर्ती.</u>

१. संबंधित संस्थेस माध्यमिक शाळा संहिता १९८१ मध्ये नमूद केलेल्या सर्व अटी व शर्तीची पुर्तता करणे बंधनकारक राहील.

२. मान्य अभ्यासक्रमांच्या नवीन / अधिकच्या तुकडया सुरु करण्यास कायमस्वरुपी विनाअनुदानित तत्वावर मान्यता दिली असली तरीही, भविष्यात कोणत्याही प्रकारचे अनुदान अथवा आर्थिक मदत देण्यांत येणार नाही.

३. मान्य अभ्यासक्रम राबविणा-या संस्थांना शासन / संचालनालय / संचालनालयाच्या अखत्यारितील संबंधित कार्यालये यांच्या कडून वेळोवेळी निर्गमित होणा-या आदेशांचे पालन करणे बंधनकारक राहील.

४. शासनाने वेळोवेळी निश्चित केलेले शिक्षण शुल्क विद्यार्थ्यांकडून आकारणे संस्थेस बंधनकारक राहील.

५. **"कायमस्वरुपी विनाअनुदान तत्वावर मान्यता मिळालेले "माध्यमिक स्तरावरील पूर्व व्यवसायिक अभ्यासक्रम"** असा सुचना फलक संस्थांनी दर्शनी भागावर लावणे बंधनकारक राहील. सुचना फलकावर अभ्यासक्रमांच्या मंजूर तुकडयांची संख्या व मंजूर प्रवेश क्षमता याचा उल्लेख करण्यात यावा.

६. मान्यतेचे आदेश निर्गमित झाल्यानंतर संबधित संस्थेने मंजुर अभ्यासक्रमासाठी मानकानुसार आवश्यक असलेल्या सर्व पायाभूत सुविधा एक महिन्याच्या कालावधी मध्ये उपलब्ध करणे बंधनकारक राहील.

७. सदर अभ्यासक्रमांना कायमस्वरुपी विनाअनुदान तत्वावर मान्यता देण्यात आल्यामुळे या अभ्यासक्रमा-करिता संस्थेने नियुक्त केलेल्या सर्व कर्मचारी वर्गाची सेवा / वेतन व तदनुषंगिक बाबींची जबाबदारी सर्वस्वी संबंधित संस्थेची राहील, याबाबत शासन कोणतीही जबाबदारी घेणार नाही.

८. मंजूर अभ्यासक्रमांकरिता आवश्यक कर्मचा-यांच्या नियुक्त्या, त्याची किमान शैक्षणिक अर्हता, अनुभव याबाबत संस्थेने महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियमावली १९८१ मधील तरतुदीनुसार तसेच शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार कार्यवाही करण्यात यावी.

९. भविष्यात सदरचे अभ्यासक्रम बंद करण्याबाबत किंवा त्यात काही बदल करण्याबाबत शासनाने निर्णय घेतल्यास तो विनाअट, विनाविलंब संस्थेने अंमलात आणणे आवश्यक राहील.

१०.अभ्यासक्रमांच्या मंजूर तुकडयांमधील प्रवेशाकरिता शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेले सामाजिक/समांतर आरक्षण व इतर नियमांचे संस्थांनी काटेकोरपणे पालन करावे व गुणानुक्रमे प्रवेश देण्यांत यावे.

११.अभ्यासक्रमांना मंजूरी मिळाल्यानंतर सदर अभ्यासक्रम संस्थेस सुरु केल्याबाबतची माहिती संस्थेने महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक परिक्षा मंडळास तात्काळ द्यावी, त्याबाबतची अनुषंगिक कार्यवाही करावी.

१२. मान्यता देण्यात आलेल्या अभ्यासक्रमाच्या अधिकच्या / नवीन तुकडयांची प्रवेश क्षमता प्रती तुकडी ६० असुन शैक्षणिक वर्ष २०१७-१८ नंतरचे मंजूर प्रवेशक्षमतेच्या ५०% पेक्षा कमी प्रवेश झाल्यास अशा तुकडया सुरु ठेवण्याकरिता संबंधित जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी यांची परवानगी घेणे बंधनकारक राहील. त्याचप्रमाणे सलग ०३ शैक्षणिक वर्षामध्ये मंजूर प्रवेशक्षमतेच्या ५०% पेक्षा कमी प्रवेश झाल्यास सदर अभ्यासक्रमाची तुकडी बंद करण्याची कार्यवाही करण्यात येईल.

१३. शैक्षणिक गुणवत्ता वाढविण्यासाठी उपरोक्त अटी व शर्तीमध्ये बदल करण्याचे किंवा नविन अटी व शर्ती अंतर्भुत करण्याचे अधिकार शासनाचे राहतील .

१४. पूर्व व्यवसाय अभ्यासक्रमाच्या मान्यता प्राप्त संस्थामध्ये विद्यार्थी प्रवेशापूर्वी संचालकांकडून स्थानिक स्तरावर समिती नेमुन समितीकडून निरीक्षण करण्यात यावे. तसेच व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयाच्या परवानगीने प्रवेश देण्याच्या अटीवरच पूर्व व्यवसायिक अभ्यासक्रमास परवानगी देण्यात यावी.

१५. व्यवसाय अभ्यासक्रमांतर्गत मंजूर व्यवसाय अभ्यासक्रमाच्या / मंजूर तुकडीनुसार प्रवेशक्षमतेपेक्षा अतिरिक्त अनधिकृत प्रवेश केल्यास शासनाने सन २०१३ या महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २० राजपत्र दिनांक २१.०८.२०१३ रोजी प्रसिध्द झालेल्या अधिनियमाव्दारे अनधिकृत संस्था स्थापन करण्यास अथवा अनधिकृत पाठयक्रम सुरु करण्यास मनाई करण्यात आलेली आहे.

१६. शासनाकडून मंजूरी प्राप्त झालेल्या शासन निर्णयात अंतर्भूत संस्थांची निरिक्षण करुन प्रवेश करण्यास संचालनालयाकडून परवानगी देण्याचा कालावधी २ वर्षाकरिता वैध असावा त्यानंतर शासन निर्णयातील मान्यता आपोआपच रद्द होईल.

शैक्षणिक वर्ष २०१७-२०१८ मध्ये मान्यता दिलेल्या उपरोक्त तक्त्यातील किती संस्थांनी व्यवसाय अभ्यासक्रम सुरु केले, याबाबत तसेच उपरोक्त शासन स्तरावरुन आढळून आलेल्या त्रुटीची पूर्तता केलेल्या संस्थाची व अभ्यासक्रम निहाय प्रवेशित विद्यार्थी संख्या याबाबतची माहिती संचालक, व्यवसाय शिक्षण यांनी शासनास दिनांक ३१/३/२०१८ पर्यंत सादर करावी.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेताक क्र. २०१८०२०२१६०७३८०४०३ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Kailas Laxman Dhakane

Digitally signed by Kailas Laxman Dhakane
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=SD and ED, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=6283d0b58cf739d67ca64d094986494b972b39cf4df46464c9bd30ae8293d9de, cn=Kailas Laxman Dhakane
Date: 2018.02.02 16:11:11 +05'30'

(कैलास ढाकणे)

कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य मुंबई-१

२) सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक, (शालेय शिक्षण विभाग), मुंबई, पुणे (व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयामार्फत.)

३) सहसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय, मुंबई, पुणे व औरंगाबाद (व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयामार्फत.)

४) संबंधित जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी (व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयामार्फत.)

५) संबंधित अशासकीय संस्था (व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयामार्फत.)

६) मा. मंत्री (कौ.वि.व उ.) यांचे खाजगी सचिव यांना माहितीसाठी सादर.

७) मा. राज्यमंत्री (कौ.वि.व उ.) यांचे खाजगी सचिव यांना माहितीसाठी सादर.

८) मा. विरोधी पक्षनेता, विधान परिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई

९) मा. विरोधी पक्षनेता, विधान सभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई

१०) मा. सचिव, कौशल्य विकास व उद्योजकता विभाग यांचे स्वीय सहायक.

११) मा. प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग यांचे स्वीय सहायक.

१२) उप सचिव , कौशल्य विकास व उद्योजकता विभाग, मंत्रालय, मुंबई-३२

१३) निवड नस्ती (व्यशि-४)